# विद्यापीठ विद्यार्थी वसतिगृह
## राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर

"सेंट्रल प्रोव्हिन्सेस शासन, शिक्षण विभागाची अधिसूचना क्रमांक ५१३, दिनांक १ ऑगष्ट १९२३, द्वारा स्थापित व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ कायदा, २०१६ द्वारा संचालित राज्य विद्यापीठ"

अधीक्षक

विधि महाविद्यालय परिसर,
अमरावती रोड, नागपूर.
फोन नं. :-


रातुमनावि/विविव/क्र. 235

दिनांक : 21/08/24

# सुचना

सर्व संबधितांना सुचित करण्यात येते कि, शैक्षणिक सत्र २०२४—२०२५ करीता(दि. १ ऑगष्ट २०२४ ते १५ जून २०२५ पर्यतच्या कालावधीसाठी) विद्यापीठाच्या विद्यार्थी वसतिगृहातील भोजनालय कंत्राटी पद्धतीने चालविण्याकरीता दरपत्रक मागविण्यात येत आहे. त्यानूसार संबधितानी खालील बाबींच्या पुर्ततेसह दि. सायंकाळी ५. ०० वा. पर्यत अधिक्षक विद्यापीठ विद्यार्थी वसतिगृह लॉ. कॉलेज परिसर, अमरावती रोड नागपूर—४४०००१ या पत्यावर आपले दरपत्रक सोबत दिलेल्या आराखड्याप्रमाणे सिलबंद लखोट्यात सादर करावे. लखोट्यावर भोजनालय करीता दरपत्रक असे स्पष्ट नमुद करावे.

दरपत्रकासोबत खालील आवश्यक दस्ताऐवज वेगळया सिलबंद लिफाफ्यात जोडावे.

१) फुडलायसन्स (गुमास्ता), २) आधारकार्ड, ३) पॅनकार्ड, ४) विजेचे देयक, ५) भोजनालय चालविण्याबाबतचे अनुभव प्रमाणपत्र.
६) १,१८० रू. स्वारस्य अभिव्यक्ती शुल्क (Expression Of Interest) Online पद्धतीने विद्यापीठाच्या आगम शाखेत (Website वर दिलेल्या लिंक वर) भरल्याची पावती.
अनुभव असलेल्या कंत्राटदाराला प्राधान्य देण्यात येईल.
तसेच भोजनगृह कंत्राटासंबंधी नियम, अटी व शर्ती सोबत जोडलेल्या आहेत (विद्यापीठाच्या Website वर Advertisement and Employment Notice या सेक्शन मध्ये) याची संबंधितांनी नोंद घेऊन त्यानुशंगाने दरपत्रक सादर करावे.
दरपत्रक सादर केलेल्या इच्छुक कंत्राटदरांनी त्यांचे सादरीकरण वसतिगृह सल्लागार समितीसमोर करण्याकरिता दिनांक रोजी वाजता विद्यापीठ विद्यार्थी वसतिगृह, लॉ. कॉलेज परिसर, अमरावती रोड नागपूर—४४०००१ या पत्यावर मूळ दस्ताऐंवज सोबत उपस्थित रहावे.

**भोजनगृह कंत्राटासंबंधी नियम, अटी व शर्ती संबंधित लिंक:**

**स्वारस्य अभिव्यक्ती शुल्क (Expression Of Interest) Online पद्धतीने भरण्याची लिंक:**

अधिक्षक
विद्यापीठ विद्यार्थी वसतिगृह
लॉ-कॉलेज परिसर,
रा.तु.म. नागपूर विद्यापीठ, नागपूर

# विद्यापीठ विद्यार्थी वसतिगृह
## राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर

"सेंट्रल प्रोव्हिन्सेस शासन, शिक्षण विभागाची अधिसूचना क्रमांक ५१३, दिनांक १ ऑगष्ट १९२३, द्वारा स्थापित व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ कायदा, २०१६ द्वारा संचालित राज्य विद्यापीठ"

**अधीक्षक**

विधि महाविद्यालय परिसर,
अमरावती रोड, नागपूर.
फोन नं. :-


रातुमनावि/विविव/क्र. 235 — दिनांक : 28/08/24

### राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ विद्यार्थी वसतिगृह येथील विद्यार्थ्यांना १० महिन्याच्या कालावधीकरीता भोजनालय सेवा कंत्राटी पध्दतीने पुरविण्यासंबंधीच्या नियम, अटी व शर्ती

**भोजनगृहात उपलब्ध करून द्यावयाची व्यवस्था :**

| | | |
|---|---|---|
| सकाळी | ८.३० ते २.३० | भोजन (सोमवार ते शनिवार) |
| | १०.३० ते २.३० | रविवारच भोजन |
| सायंकाळी | ७.३० ते १०.०० | भोजन |

- **भोजनाचे विवरण** : सकाळ व सायंकाळ वरण भात, १ भाजी, पोळी, कोशिंबीर/सलाद/लोनचे इ.

- दर रविवारी सकाळी किंवा सायंकाळी भोजनात करावयाचा बदल :

- पूरी/पोळी,भाजी,पुलाव किंवा मसाला भात, सलाद, १प्लेट खारा(भजी/दहीवडा इत्यादी.)
- १प्लेट मिठाई (गुलाबजामून/रसमलाई/रसगुल्ले/शिरा, जिलेबी, शेवयाची खीर, इत्यादी.)
- मुलांच्या विनंतीनूसार अतिरिक्त पैसे घेउन दुध, चहा, नाश्ता उपलब्ध करून द्यावे लागेल. आजारी मुलांना डॉक्टरांनी सांगितलेले भोजन द्यावे लागेल. उशीरा येणाऱ्या मुलांना आगावू सुचना दिल्यास त्यांचे भोजन राखून ठेवण्यात यावे. एका मुलांच्या नावावर दुसऱ्या मुलाला भोजन देण्यास येउ नये. भोजनगृहात भोजन तयार करण्यासाठी उत्तम प्रतीचे धान्य व तेल (शेगदाणा किंवा सनफ्लॉवर व सोयाबीन तेल) तसेच उत्तम दुकानातील उत्तम प्रतीची मिठाई उपलब्ध करून द्यावी लागेल. भोजनगृहातील भाज्या व अन्नधान्य नीट निवडून स्वच्छ करून घेण्यात यावे. भाज्या मध्ये ऋतूनुसार बदल करून देण्यात यावे.

- आठवड्याचा सविस्तर मेनू जोडपत्र १ नुसार देण्यात यावे.

अधिक्षक
विद्यापीठ विद्यार्थी वसतिगृह
लॉ-कॉलेज परिसर,
रा.तु.म. नागपूर विद्यापीठ, नागपूर

| | …टदाराचे नाव | फुडलायसन्स गुमास्ता रजिस्ट्रेशन नंबर | आधार कार्ड नंबर | विजेचे देयक बिल पत्ता | भोजनालय चालविण्याबाबतचे अनुभव प्रमाणपत्र व कालावधी | रु.१,१८० अधिव्यक्ती शुल्क भरल्याची पावती नं. व दिनांक | दरपत्रकानुसार दर | पॅन कार्ड नं. | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | |

अधिक्षक
विद्यापीठ विद्यार्थी वसतिगृह
लॉ-कॉलेज परिसर,
रा.तु.म. नागपूर विद्यापीठ, नागपूर

# आठवड्याचा खालील मेनू देण्यात यावा

## जोडपत्र — १

| | सोमवार | मंगळवार | बुधवार | गुरूवार | शुक्रवार | शनिवार | रविवार |
|---|---|---|---|---|---|---|---|
| सकाळ | आलुवांगे पाटोडी / लोणचे | फणस / ढेमस कडधान्याचे प्रकार | आलूवटाणे / शेवभाजी | चवळी शेंगा / बिन्स / वालाच्या शेंगा / गवार शेंगा | कोहळ / लवकी | पत्तागोबी / मसाले वांगे | **वेज:—** पनीरचे प्रकार / कोप्ता भाजीचे प्रकार / छोले भुटरे / आलुची चटणी +पुरी / मलाई मेथीमटर १प्लेट खारा, १ प्लेट मिठाई **नॉनवेज:—** मटण, चिकन, मच्छी, अंडाकरी. इ. |
| सायं काळ | भेंडी / आलूच भरीत / ताक | वांग्याचं भरीत टमाटरची चटणी / ताक | आलूकोबी / कारले / मिक्स वेज / ताक | दाळपालक / आलूपालक / मेथी / चवळी भाजी / ताक | झुणका / शिमला मिरची बेसन / ताक | आलूची भाजी / दम आलू / ताक | पूलाव कढी / मसाला भात / कढी / खिचडी बेसन वेज बिर्यानी / ताक |
| सलाद | गाजर / काकडी | मुळा / बिट | कांदा / टमाटर | गाजर / काकडी | बीट / कांदा | काकडी / गाजर | बीट / मुळा |

**टिप: विद्यापीठ विद्यार्थी वसतिगृहातील भोजनालयातील जेवण हे मेनुनूसार व ऋतूनूसार देण्यात यावे तसेच जेवनातील पुनरावृत्ती टाळणे.**

अधिक्षक
विद्यापीठ विद्यार्थी वसतिगृह
लॉ-कॉलेज परिसर,
रा.तु.म. नागपूर विद्यापीठ, नागपूर

# विद्यापीठ विद्यार्थी वसतिगृह
## राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर

"सेंट्रल प्रोव्हिन्सेस शासन, शिक्षण विभागाची अधिसूचना क्रमांक ५१३, दिनांक १ ऑगष्ट १९२३, द्वारा स्थापित व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ कायदा, २०१६ द्वारा संचालित राज्य विद्यापीठ"

अधीक्षक
डॉ.हितेश मा. दडमल

विधि महाविद्यालय परिसर,
अमरावती रोड, नागपूर.
फोन नं.. :-


रातुमनावि/विविव/क्र.235

दिनांक : 21/08/24

**राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ,नागपूर अंतर्गत चालविल्या जाणारे विद्यापीठ विद्यार्थी वसतिगृह, विधी महाविद्यालय परीसर, नागपूर येथे कंत्राट पध्दतीने १० महीण्याच्या कालावधी करीता भोजनालय सेवा पुरविण्याबाबत करारनामा.**

**नियम, अटी व शर्ती:—**

१. विद्यापीठ स्तरावर केंद्रिय पध्दतीने पूर्णत्वास न आल्यामुळे जो पर्यंत केंद्रिय कंत्राट पूर्णत्वास येत नाही तो पर्यंत किंवा सत्र १ जुलै ते ३० एप्रिल पर्यंत भोजनालय सुरु राहील.

२. ज्याचा नावे भोजनालय दिल्या गेला असेल त्यांनीच भोजनालय चालवावे, अन्य इसम सापडल्यास तत्काळ कंत्राट रद्द् करण्यात येईल.

३. वीज देयक कंत्राटदाराला भरावे लागेल. त्यामध्ये खंड पडल्यास भोजनालय कंत्राट रद्द् करण्यात येईल. वीज देयक बिल विद्यापीठाच्या अभियांत्रिकी विभाग कडुन मिळेल.
विज बिल भरल्याची पावती वसतिगृह कार्यालयात जमा करावे.

४. ज्या भोजनालय कंत्राटदाराला मेस दिल्या जाईल त्याने
१) मेस खोली भाडे रु.१०००/— (अक्षरी हजार रुपये) प्रति महीना.
२) अनामत रक्कम रु.२५,०००/— (अक्षरी पंचवीस हजार रुपये).
३) विज बिल डिपॉजिट रु.२५,०००/— (अक्षरी पंचवीस हजार रुपये).
४) भांडी कुंडी भाडे वार्षिक रु.५०००/— (अक्षरी पाच हजार रुपये).
५) इलेक्ट्रीक बिलं
रा.तु.म.नागपूर विद्यापीठाच्या,महात्मा ज्योतिबा फुले शैक्षणिक परीसरातील आगम शाखेत कंत्राट मिळाल्यानंतर ३ दिवसात भरणे आवश्यक आहे.

५. सत्र १ जुलै ते ३० एप्रिल पर्यंत संबधीत सर्व रक्कम राहील पुढे उन्हाळयाच्या सुट्यात ( मे व जुन महिण्यात) मेस करार नव्याने होण्या अगोदर पर्यंत मेस भाडे रु.१०००/— प्रती महीणा भरुन व स्वतंत्र वील बिल भरण्याच्या हमीवर मेस चालविता येईल.

६. नवीन मेस कंत्राटदाराला विद्यापीठाने ठरविल्यास ७ दिवसाच्या आत मेस सोडावे लागेल, तसे न केल्यास सामाना सहीत मेस विद्यापीठ प्रशासन आपल्या ताब्यात घेईल.

. व कंत्राटदाराला विद्यापीठा कडुन मेस चालविण्यासाठी स्वयंपाक खोली,रिकामे सिलेंडर, व इतर साहित्य उपलब्ध करुन देण्यात येईल, उर्वरीत सामान कंत्राटदाराला स्वत: आणावे लागेल.

८. विद्यापीठाने पुरविलेल्या साहित्याचे नूकसान झाल्यास, चोरी गेल्यास, गहाळ झाल्यास कंत्राटदाराच्या अनामत रक्कमेतुन नूकसान भरपाई करण्यात येईल.

९. कोणत्याही कारणाने सत्राच्या मध्ये मेस बंद पडल्यास अनामत रक्कम परत केली जाणार नाही.

१०. अधिक्षकांच्या परवानगी शिवाय बाहेरच्या व्यक्तींना किंवा विद्यार्थ्यांना जेवणाची परवानगी देता येणार नाही.

११. मेस मधील अन्नामुळे विषबाधा झाल्यास, कोणत्याही प्रकारचा अनूचित प्रकार घडल्यास किंवा इतर प्रकार घडल्यास कंत्राटदार स्वत: जबाबदार राहील. विद्यापीठ याबाबत कोणत्याही प्रकारची जबाबदारी घेणार नाही.

१२. अन्न व औषध प्रशासन विभाग, महाराष्ट्र राज्य यांच्या कडून मेस चालविण्याचा परवाना पत्र व गुमास्ता असणे आवश्यक आहे.

१३. मेस चालु असतांना वसतिगृहात बाहेरचे डब्बे येणार नाहीत याची खबरदारी कंत्राटदाराला स्वत: घ्यावे लागेल.

१४. जेवणासंबधी कोणत्याही प्रकारची तक्रार असल्यास विद्यार्थी समिती मार्फत समस्या सोडविली जाईल.

१५. पोलीस विभाग, कोर्ट, महाराष्ट्र शासन, महानगर पालीका व इतर शासन संस्था यांनी जेवन व इतर स्वच्छतेबाबत कंत्राटदारावर कार्यवाही केल्यास विद्यापीठ जबाबदार राहणार नाही.

१६. मेस मध्ये सकाळी व सायंकाळी जेवण दयावे लागेल. भोजनालयाची वेळ साधारणता: सकाळी १०.३० वा. पासून ते १ वाजेपर्यंत व सायंकाळी ६.३० ते १०.३० वाजेपर्यंत राहील. परीक्षा काळात वेळेत बदल करता येईल.

१७. विद्यापीठाचे मासिक दर ठरविणार नाही. मेस कंत्राटदाराला मेस कोटेशन मध्ये दर द्यावे लागतील. विद्यापीठाने मेस कंत्राटदाराच्या मेस दाराची मंजुरी दिल्यास संपुर्ण वर्ष एकच दर ठेवावे लागेल. मेस कंत्राटदाराला स्वच्छेने दर वाढविता येणार नाही. असे केल्यास मेस कंत्राट आपोआप रद्द् होईल.

१८. स्त्री कामगारांची आवश्यकता असल्यास अधिक्षक यांची परवानगी घेणे आवश्यक आहे. स्त्री कामगारांची कोणतेही तक्रार येणार नाही. याची खबरदारी मेस कंत्राटदाराला घ्यावी लागेल.

१९. विद्यापीठाकडून मिळालेल्या मेस सामानाची दुसऱ्या कामासाठी उपयोग करता येणार नाही. व बाहेरचे ऑर्डर अधिक्षक यांचा परवानगी शिवाय घेता येणार नाही.

अठरा वर्षाखालील कामगार मेस मध्ये काम करणार नाही. याची खात्री कंत्राटदारानी स्वत: करुन घ्यावी. सरकार व इतर संस्थाकडुन कारवाई झाल्यास विद्यापीठ जबाबदार राहणार नाही.

२१. वसतिगृह मेस मध्ये कुंटुब राहणार नाही. कुंटुब असल्यास मेस खोलीचे स्वंतत्र भाडे भरावे लागेल.

२२. मेस कंत्राटदारला मेस डिपॉजिट मधुन विद्यार्थ्यांचे मेस फि घ्यावयाची असल्यास संबंधित विद्यार्थ्यांकडून सहमती पत्र, दिल्या जाणाऱ्या रकमेची नोंद, नाव व सही अर्जात असणे आवश्यक आहे.

२३. मेस मध्ये मेस कंत्राटदारच्या कामाच्या हलगर्जी पणामुळे कोणत्याही प्रकारची दुर्घटना घडल्यास विद्यापीठ जबाबदार राहणार नाही.

२४. कंत्राटदार व मेस कामगार यांच्यात कोणत्याही प्रकारचा वाद, भांडण उद्‌भवल्यास किंवा कोणत्याही कारणासाठी एकमेकाविरुद्ध पालीस तक्रार दाखल झाल्यास किंवा एकमेकाविरुद्ध कोर्टात गेल्यास विद्यापीठ जबाबदार राहणार नाही.

२५. मेस कंत्राटदाराने प्रत्येक महिण्यात विद्यार्थ्यांना मेस रशीद देणे आवश्यक आहे.

२६. मेस कंत्राटदार मेस मध्ये काम करणारे सर्व कामगार यांचे कायमचे व तत्कालीन पत्ताचा पुराव व फोटो वसतिगृह कार्यालयात जमा करावा लागेल.

२७. मेस संबधी खाते, विद्यार्थांना देण्यात येणारे पावत्या इत्यादी तपासण्याचे सर्व अधिकार अधिक्षक किंवा विद्यापीठ प्रशासनाला राहील.

२८. विद्यार्थ्यांकडून मेस बद्दूल तक्रारी आल्यास किंवा विद्यार्थी समिती व्दारे तक्रार प्राप्त झाल्यास मेस कंत्राटदाराला एका आठवडयात मेस बंद करावी लागेल. मेस बंद करण्यापुर्वी विद्यापीठाने दिलेले सर्व साहीत्य परत करावे लागेल. तसेच वीज बिल किंवा इतर प्रकारचे देणे असल्यास ताबडतोब दयावे लागेल. मेस कंत्राटदाराने ७ दिवसात मेस बंद न केल्यास मेस कंत्राटदाराच्या सामानासहीत मेस विद्यापीठ आपल्या ताब्यात घेईल व आवश्यकता भासल्यास पोलीस कार्यवाही करण्यात येईल.

२९. विद्यार्थी समितीने एका वसतिगृह सत्रामध्ये एक किंवा त्यापेक्षा जास्त मेस कंत्राटदार बदलविल्यास त्यासाठी ७५ विद्यार्थ्यांची लिखित सहमती असणे आवश्यक राहील.

३०. विद्यार्थ्यांना दर वर्षी कमीत कमी ७ सदस्य समिती स्थापण करावी लागेल. या समितीला मेस कंत्राटदार सुचविणे, विद्यापीठाकडून घेतलेले सामान परत घेणे, वीज बिल, मेस किराया वेळेवर भरल्या बाबत खात्री करण्याची जबाबदारी राहील. मेस कंत्राटदारने कोणत्याही प्रकारचे नुकसान, देयक भरण्यास असमर्थता दाखविल्याचे त्याची सर्वस्वी जबाबदारी विद्यार्थी समितीची राहील.

३१. मेस कंत्राटदारने जमा केलेल्या मेस अनामत रकमेतून वीज देयकची कपात केल्या जाणार नाही.

३२. विद्यार्थ्यांनी स्थापण केलेल्या समिती द्वारे दर वर्षी ३० जून च्या आधी किंवा १ सप्टेंबर नंतर मेस कंत्राटदार बदलण्याची परवानगी देण्यात येईल. जुलै —ऑगष्ट महीण्यात वसतिगृह प्रवेश प्रक्रिया सुरु असते. त्यामुळे या महीण्यात मेस कंत्राटदार बदलण्याची किंवा नविन मेस सुरु करण्याची परवानगी देता येणार नाही.

३३. विद्यापीठ प्रशासनाकडून वेळोवेळी मिळालेल्या सुचनेप्रमाणे नियमावलीमध्ये बदल करण्याचे अधिकार अधिक्षकांना राहील.

३४. फ़िल्टर अथवा स्वच्छ पिण्याच्या पाण्याची पुरवठा करण्याची जबाबदारी मेस कंत्राटदार यांची राही.

३५. विज बील, फिक्स डिपॉजिट तसेच मासिक भाडे याची पोचपावती वसतिगृह कार्यालयात नियमित जमा करण्याची जबाबदारी मेस कंत्राटदाराची राहील.

३६. प्रति महीण्यात मेस विद्यार्थ्यांची जेवणा संबंधीत नोंद बाबत माहीती कार्यालयाला देणे.

३७. भोजनालय कंत्राट धारक यांच्या भोजनाची गुणवंता, कंत्राटी निकष, व्यवस्था, सोयी—सुविधा, आणि कंत्राट निविदाखाली योजलेली रक्कम या संबधी कंत्राट देण्याचा पूर्ण अधिकार विद्यापीठाला राहील.

३८. भोजनालय सत्राच्या मध्येच बंद केल्यास खोली भाडयाची रक्कम परत मिळणार नाही.

३९. विद्यापीठाने वेळोवेळी नविन जाहीर केलेली नियमावली नुसार भोजनालय कंत्राट धारकाला नविन नियमावली लागू होईल.

अधिक्षक
विद्यापीठ विद्यार्थी वसतिगृह
लॉ-कॉलेज परिसर,
रा.तु.म. नागपूर विद्यापीठ, नागपूर